


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ७१ वा | बुधवार, दि. ०७ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# निवडणूक आयोगाविरोधात विरोधकांचा एल्गार !

## लोकशाहीच्या रणांगणात राहुल गांधी; 'मतचोरी'विरोधातील आंदोलनानंतर ताब्यात!

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता आणि 'एसआयआर'च्या मुद्द्यावरून केंद्र सरकार तसेच निवडणूक आयोगाविरोधातील विरोधकांचा संताप मंगळवारी राजधानी दिल्लीत उफाळून आला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी-वाड्रा यांच्यासह इंडिया आघाडीतील नेत्यांनी आकाशवाणी भवनाबाहेर तब्बल नऊ तास ठिय्या आंदोलन करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भेटीची मागणी लावून धरली. अखेर रात्री दिल्ली पोलिसांनी कारवाई करत राहुल गांधी, प्रियांका गांधी आणि अनेक विरोधी पक्षांच्या खासदारांना ताब्यात घेतले. प्रियांका गांधी यांना काही वेळाने सोडण्यात आले; मात्र राहुल गांधी यांना पोलिसांच्या बसमधून नेण्यात आल्याने आंदोलनस्थळी मोठा गोंधळ उडाला.

मंगळवारी दुपारी साडेबारा वाजल्यापासून राहुल गांधी, प्रियांका गांधी आणि काँग्रेससह विरोधी पक्षांचे अनेक नेते आकाशवाणी भवन परिसरात ठाण मांडून बसले होते. आकाशवाणी भवन हे निवडणूक आयोगाच्या कार्यालयाच्या अगदी जवळ असल्याने आंदोलनाला विशेष





राजकीय महत्त्व प्राप्त झाले. 'मुख्य निवडणूक आयुक्तांना भेटल्याशिवाय येथून हटणार नाही,' अशी भूमिका राहुल गांधी यांनी घेतली.

निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे जाणाऱ्या मार्गावर दिल्ली पोलिसांनी मोठ्या प्रमाणात बॅरिकेड्स उभारले होते. मागील गेटकडील रस्ताही बंद करण्यात आला होता. पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. विरोधकांनी बॅरिकेड्सवर चढून घोषणाबाजी केली. वातावरण तापल्यानंतर काही नेते आणि कार्यकर्ते आकाशवाणी भवनाच्या आवारात शिरले.

### 'लोकशाही वाचवण्यासाठी लढतोय'

आंदोलनस्थळावरून पत्रकारांशी संवाद साधताना राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर जोरदार हल्लाबोल केला. 'भाजप काय म्हणते, यामध्ये मला रस नाही. आम्ही केवळ भाजपला विरोध करत नाही; देशातील लोकशाही वाचवण्यासाठी उभे आहोत,' असे गांधी यांनी म्हटले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर राहुल गांधी यांनी गंभीर आरोप केले. देशातील लोकशाही संपुष्टात आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा दावा त्यांनी केला. तरुणांना 'मतचोरी'चा प्रकार समजला असून निवडणुका हायजॅक केल्याचा आरोपही त्यांनी केला.

दरम्यान, राहुल गांधी यांच्या या आरोपांवर भाजप किंवा निवडणूक आयोगाची अधिकृत भूमिका या आंदोलनाच्या वेळी समोर आलेली नव्हती.

### अखिलेश यादवांकडून ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनीही मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांनी 'मतचोरी'चे आरोप केले. पश्चिम बंगालमधील निवडणूक प्रक्रियेबाबतही त्यांनी गंभीर आरोप केले. विरोधकांचा आरोप आहे की, मतदार यादी आणि निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमिततेमुळे लोकशाहीच्या मूलभूत प्रक्रियेवर प्रश्न निर्माण झाले आहेत. या आरोपांवर निवडणूक आयोगाकडून स्पष्टीकरणाची मागणी विरोधकांनी केली आहे.

### बॅरिकेड्सवर चढले नेते; पोलिसांची कारवाई

सकाळपासूनच विरोधी पक्षांचे नेते आणि खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे जाण्याचा प्रयत्न करीत होते. मात्र पोलिसांनी आकाशवाणी भवनाजवळच त्यांना अडवले. त्यामुळे नेते आणि पोलिसांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले. संतप्त कार्यकर्त्यांनी बॅरिकेड्सवर चढून घोषणाबाजी केली.

राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्यासोबत काँग्रेसचे माध्यम विभागाचे प्रमुख पवन खेरा यांच्यासह अनेक कार्यकर्ते रात्रीपर्यंत आंदोलनस्थळी उपस्थित होते. अखेर रात्री पोलिसांनी आंदोलनकर्त्यांवर कारवाई केली.

### १ नोव्हेंबरला रामलीला मैदानात विरोधकांची महसभा!

एसआयआर आणि कथित निवडणूक अनियमिततेच्या मुद्द्यावर विरोधकांचा संघर्ष आता पुढील टप्प्यात जाण्याची शक्यता आहे. इंडिया आघाडीच्या १ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या सभेसाठी दिल्लीतील रामलीला मैदान बुक करण्यात आले आहे. याशिवाय राष्ट्रपतींची भेट घेण्यासाठी ७ किंवा ८ ऑक्टोबर रोजी वेळ मागण्यात आली असून, ९ ऑक्टोबरची वेळ मिळाली तरी ती स्वीकारण्याची तयारी विरोधकांनी दर्शविली आहे.

राष्ट्रपतींची भेट घेणाऱ्या शिष्टमंडळात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, शरद पवार, ओमर अब्दुल्ला, तेजस्वी यादव आणि डी. राजा यांचा समावेश असण्याची शक्यता आहे.

### आंदोलनाचा संदेश : 'हिशेब द्या!'

एसआयआर, मतदार यादी आणि कथित 'मतचोरी'च्या आरोपांवरून विरोधकांनी निवडणूक आयोगाला थेट लक्ष्य केले आहे. त्यामुळे १ नोव्हेंबरची रामलीला मैदानातील सभा आणि राष्ट्रपतींची प्रस्तावित भेट या आंदोलनाच्या पुढील राजकीय दिशेचे केंद्र ठरण्याची शक्यता आहे.

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी, कल्याण बॅनर्जी, डेरेक ओ'ब्रायन, इम्रान मसूद, पी. संतोष, ए. रहीम यांच्यासह अनेक खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांना विविध पोलीस ठाण्यांमध्ये नेण्यात आले.

### राहुल गांधींना बसमधून नेले; 'सर्व काही लक्षात ठेवले जाईल'

राहुल गांधी यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर बसमधून घेऊन जातानाचा व्हिडीओ काँग्रेसने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर प्रसिद्ध केला. या व्हिडीओसोबत काँग्रेसने 'सर्व काही लक्षात ठेवले जाईल' असा इशारा देणारे कॅप्शन दिले.

राहुल गांधी आणि अन्य विरोधी पक्षांच्या नेत्यांना ताब्यात घेतल्यानंतर आंदोलनस्थळी काही काळ मोठा गोंधळ निर्माण झाला. निवडणूक आयोगाच्या कार्यालयाभोवती सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली.

### विरोधकांचा लढा आता दिल्लीच्या रस्त्यावर

एसआयआर आणि निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमिततेचा मुद्दा आता संसद आणि राजकीय व्यासपीठापुरता मर्यादित न राहता थेट दिल्लीच्या रस्त्यावर पोहोचला आहे. विरोधकांनी निवडणूक आयोगाकडून उत्तर मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यामुळे आगामी काळात हा मुद्दा आणखी तापण्याची चिन्हे आहेत.

राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनामुळे इंडिया आघाडीतील विविध पक्ष पुन्हा एका व्यासपीठावर आल्याचेही चित्र दिसले. निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित करत विरोधकांनी थेट मुख्य निवडणूक आयुक्तांच्या भेटीची मागणी केल्याने केंद्राच्या राजकीय वर्तुळातही या आंदोलनाची चर्चा रंगली आहे.

# महालक्ष्मी महिला पापड गृह उद्योग देणार दुष्काळग्रस्त महिलांना रोजगार

## उद्योजक राजेश डोंगरे यांचा निर्धार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जुनी लक्ष्मी विष्णु चाळ, डोणगांव रोड, सोलापूर येथील महालक्ष्मी महिला पापड गृह उद्योगतर्फे

दुष्काळग्रस्त सुमारे 3 हजार महिलांना रोजगार देण्यात येणार आहे, अशी माहिती उद्योजक राजेश डोंगरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बिकट परिस्थितीत सोलापूरच्या महालक्ष्मी पापड उद्योगाने माणुसकीचा हात पुढे केला आहे. 'दुष्काळ पडला म्हणून घाबरू नका, आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत,' असा दिलासा देण्याचा प्रयत्न आहे. जिल्ह्यातील गरजवंत दोन ते तीन हजार महिलांना घरबसल्या रोजगार देण्याचा आमचा संकल्प आहे. महालक्ष्मी पापड उद्योगाच्या माध्यमातून महिलांना पापड, कुरडई, सांडगे, लोणचे तयार करण्याचे काम दिले जाणार आहे. यासाठी महिलांना कोणतीही गुंतवणूक करावी लागणार नाही. कच्चा माल घरपोच पोहोचवला जाईल आणि तयार झालेला माल आमचे कर्मचारी घरी येऊन घेऊन जातील. कामाचा मोबदला दर आठवड्याला रोख स्वरूपात दिला जाणार आहे.ही योजना केवळ दुष्काळापुरती नाही, तर कायमस्वरूपी रोजगाराची संधी आहे.




सोलापूर जिल्ह्यात यंदा पावसाने मोठी ओढ दिल्याने खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला असून, पाण्याअभावी रब्बी हंगामही धोक्यात आला आहे. शेतात पीक नाही, हाताला काम नाही, अशा दुहेरी संकटामुळे शेतकरी आणि शेतमजूर हवालदिल झाले आहेत. बँकेचे हप्ते, मुलांचे शिक्षण आणि दैनंदिन खर्च भागविण्याची चिंता ग्रामीण कुटुंबांना सतावत असताना, सोलापूरच्या महालक्ष्मी पापड उद्योगाने माणुसकीचा हात पुढे केला आहे. उद्योगाचे संचालक राजेश डोंगरे यांनी जिल्ह्यातील गरजू दोन ते तीन हजार महिलांना घरबसल्या रोजगार देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

विशेषतः उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी, मोहोळ, माढा तालुक्यातील शेतमजूर कुटुंबातील महिलांना प्राधान्य दिले जाणार आहे. ज्या महिलांना कामाची गरज आहे अशांनी महालक्ष्मी पापड उद्योग, लक्ष्मी विष्णू चाळ, डोणगाव रोड, सोलापूर (मो.८५८५०२२९२९, ८५५२००५०५२) येथे थेट संपर्क साधावा, असे आवाहन डोंगरे यांनी केले आहे.

दुष्काळामुळे ग्रामीण भागातील कुटुंबांचे अर्थचक्र कोलमडले असताना महिलांच्या हाताला घरबसल्या रोजगार उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम संकटग्रस्त कुटुंबांसाठी मोठा आधार ठरण्याची शक्यता आहे.

या पत्रकार परिषदेला लक्ष्मी कांबळे, नयना चौगुले, कृष्णकांत चव्हाण, सुनिता खांडेकर उपस्थित होते.

'शेतकरी जगला तरच देश जगेल. आज शेतकरी अडचणीत असताना त्याच्या कुटुंबातील महिलांना आर्थिक बळ देणे ही आमची जबाबदारी आहे. ही योजना केवळ दुष्काळापुरती मर्यादित नसून, कायमस्वरूपी रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे,' असे राजेश डोंगरे यांनी स्पष्ट केले.

# सावंत कुटुंबीयांचे अखेर मनोमिलन

## तानाजी अन शिवाजी सावंतांचे मुलांसोबत एकत्र

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातून राजकीय कारकिर्दीस सुरुवात करून सोलापूर जिल्हा, मराठवाडा आणि पुढे राज्याच्या मंत्रिमंडळापर्यंत पोचलेले सावंत कुटुंबीयांमध्ये मध्यंतरी फूट पडली होती.

विशेषतः माजी मंत्री तानाजी सावंत आणि शिवाजी सावंत यांच्यात वाद झाला होता. मात्र, त्या वादावर आता पडदा पडला असून सावंत कुटुंबीयांत अखेर मनोमिलन झाले आहे.

दरम्यान, सावंत कुटुंबीयांच्या मनोमिलनाचे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. त्यात माजी मंत्री तानाजीराव सावंत, शिवाजी सावंत आणि त्यांची मुलं दिसून येत आहेत.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने प्रभावित होऊन प्रा. शिवाजी सावंत यांनी शिवसेनेच्या माध्यमातून राजकीय वाटचालीचा श्रीगणेशा केला होता. कोणती राजकीय पार्श्वभूमी नसताना प्रा. सावंत यांनी शिवसेनेत नेटाने कामाला सुरुवात केली होती. त्या बळावरच त्यांनी जिल्हा परिषद सदस्य, विरोधी पक्षनेता



म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेत काम केले होते. त्यामुळे सावंत कुटुंबीयांची ओळख जिल्ह्यात झाली.

प्रा. तानाजी सावंत यांनी जीएसपीएमच्या माध्यमातून आपला विस्तार वाढवला होता. त्यांनीही शिवसेनेच्या माध्यमातून विधान परिषदेची आमदारकी मिळविली. त्यानंतर धाराशिव जिल्ह्यातील भूम-परांडा विधानसभा मतदारसंघात राजकीय बस्तान बसविले.

शिवसेनेत बंड केलेले एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे तानाजी सावंत यांना महायुती सरकारमध्ये आरोग्य मंत्री म्हणून थेट कॅबिनेटमध्ये संधी मिळाली. त्यामुळे सावंत कुटुंबीयांचा सोलापूर, धाराशिव आणि राज्याच्या राजकारणात चांगला दबदबा वाढला.

दुसरीकडे, भैरवनाथ शुगर आणि जेएसपीएम या माध्यमातून साखर कारखानदारी आणि शिक्षण क्षेत्रात दबदबा निर्माण झाला. पाच बंधू आणि त्यांची ११ मुले या सर्व संस्थांचा कारभार पाहू लागली होती. राज्याच्या राजकारणातील एकत्र कुटुंबातील मोठे घराणे म्हणून सावंत कुटुंबीयांचे नाव चर्चेत येऊ लागले.

उद्योग, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात नावलौकिक होत असताना शिवाजी सावंत आणि तानाजी सावंत यांच्यात मतभेद निर्माण झाले. या मतभेदाची नेमकी कारणे पुढे आली नसली तरी भैरवनाथ शुगरचे विभाजन करून माढा तालुक्यातील राजवी आणि करमाळा तालुक्यातील शिवगिरी हे दोन कारखाने स्वतंत्र झाले, हे मानले जाते. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत या दोन भावांमध्ये जाहीरपणे वाद झाला.

शिवाजी सावंत यांचा भाजप प्रवेशाचा कार्यक्रम दोन वेळी ठरूनही तो ऐनवेळी रद्द झाला. त्यामागे तानाजी सावंत असल्याचा आरोप शिवाजी सावंत यांनी केला होता. त्यावेळी दोन्ही भावांमध्ये टोकाचे मतभेद झाल्याचे पुढे आले होते.

शिवाजी सावंत यांचे चिरंजीव पृथ्वीराज सावंत यांनी भाजपमधून जिल्हा परिषदेची निवडणूक जिंकली. मात्र, चुलते शिवसेनेत तर पुतण्या भाजपमध्ये अशी राजकीय विभागणी झाली होती. मात्र, मंगळवारी (ता. ६ ऑक्टोबर) प्रा. शिवाजी सावंत आणि प्रा. तानाजी सावंत तसेच प्रा. शिवाजी सावंत यांचे पुत्र जिल्हा परिषद सदस्य पृथ्वीराज सावंत, वाकवचे माजी सरपंच ऋतुराज सावंत यांची माजी मंत्री तानाजी सावंतांसोबतची छायाचित्रे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहेत. त्यामुळे सावंत कुटुंबातील मतभेद भेटून हे घराणे एकत्र आले आहे.

# राज्यात दुष्काळाचा दाह वाढला!

## आणखी १८ तालुक्यात दुष्काळ जाहीर



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात १० टक्के पाणी कपातीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी तसेच दुष्काळी भागात रोजगार हमी योजनेतील कामे वाढवावीत असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत दिले.

दुसरीकडे राज्यात दुष्काळाची व्याप्ती वाढू लागली असून आणखी १८ तालुक्यात दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्याचा निर्णय मंगळवारी दुष्काळ निवारण उपाययोजना मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे राज्यातील दुष्काळी तालुक्यांची संख्या आता ३०२ झाली आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यातील पंचनामे २० ऑक्टोबर पूर्वी पूर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले असून बाधित शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत करण्याचे नियोजन करण्याचेही समितीने प्रशासनास दिले.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. यावेळी राज्यातील २६५ तालुक्यातील ३२ हजार ८२३ गावांपैकी १७ हजार ९४१ गावातील ३८ लाख (पान 2 वर..)




# शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीचा मार्ग मोकळा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र सरकारने शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्या करण्याचे स्पष्ट निर्देश दिल्याने शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

आंतरजिल्हा बदलीचा सातवा टप्पा राबविण्यासाठी अनेक वर्षापासून प्रतीक्षेत शिक्षकांसाठी शिक्षक सहकार संघटनेने सातत्याने पाठपुरावा केला.

याला अखेर यश आले. केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने महाराष्ट्र शासनाला आंतरजिल्हा



बदली संदर्भात कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. ११ ऑगस्टला आझाद मैदानात महिला शिक्षकांनी कुटुंबीयांसह मुंडन आंदोलन केले होते. त्यावेळी ग्रामविकास मंत्री, शिक्षण मंत्री, शिष्टमंडळाने भेट घेतली होती. दोन्ही मंत्र्यांनी केंद्र शासनाने बदल्या न करण्याबाबत महाराष्ट्र शासनाला निर्देश दिल्याचे सांगितले होते.

शिक्षक सहकार संघटनेच्या विनंतीमुळे त्यांनी बदलीचा टप्पा राबवण्याबाबत मार्गदर्शन मागविण्याचे आश्वासन दिले होते. संघटनेने केंद्र शासनाच्या गृह मंत्रालय, शिक्षण मंत्रालयाकडे हजारो ई-मेल पाठवले. तसेच गृह विभागाचे सचिवांची दोनवेळा प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिले. त्याची दखल घेऊन केंद्राने बदल्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.



## संपादकीय

# एसआयआरवरून देशात खदखद

केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात सध्या देशभर वातावरण तापले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय निवडणूक आयोगाने देशभरात 'विशेष सखोल पुनर्निरीक्षण' अर्थात 'एसआयआर'च्या अंतर्गत मतदार याद्या सुधारण्याचे काम सुरू केले आहे. त्यात देशभरातून तब्बल १३ कोटी लोकांची नावे वगळण्यात आली आहेत; शिवाय यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी जो सहा क्रमांकाचा अर्ज भरावा लागतो, त्यात विचित्र व जाचक अटी त्यांनी घातल्या. त्यातच ज्ञानेशकुमार हे मुख्य आयुक्त असले, तरी इतर दोन आयुक्तांच्या सहमतीनेच आयोगातील निर्णय त्यांनी घ्यावेत, असा कायदा असताना त्यालाही त्यांनी हरताळ फासल्याचे पुरावेच प्रसार माध्यमातून समोर आले. इतके सगळे झाल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारतीय जनता पक्ष व केंद्रीय निवडणूक आयोग यांना विरोधक लक्ष्य करणे अगदीच स्वाभाविकच आहे.

मुंबईत शुक्रवारचे कॉक्रोच जनता पार्टीचे (सीजेपी) आंदोलन व रविवारी शिवसेना (उबाठा) व मनसे यांच्या मोचार्ला मिळालेला प्रतिसाद पाहता, जनतेच्या मनात याविषयी खदखद आहे, हे नाकारता येणार नाही. मात्र, मुंबईतील ही दोन्ही आंदोलने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने ज्या पद्धतीने हाताळली, त्यावरून केंद्रातील भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाने खरे तर धडा घ्यायला हवा.

जंतर मंतरवरील आंदोलकांविरोधात केला गेलेला पोलिसी बळाचा वापर राजकीयदृष्ट्या केंद्र सरकारला खूपच अडचणीचा ठरला होता. यावरून धडा घेऊन फडणवीस यांनी या दोन्ही आंदोलनांत कुठेही पोलिसी बळाचा वापर केला नाही. अगदी शिवाजी पार्कातल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलन स्थळावर उपस्थित पोलिसांकडे लाठ्या अथवा शिरस्त्राणेही नव्हती.

उद्धव व राज या ठाकरे बंधूंच्या मोचार्ला अपेक्षेप्रमाणेच मोठा प्रतिसाद लाभला. महाराष्ट्रातून दोन कोटी व देशातून १३ कोटी मतदार वगळले जाणे, मुख्य निवडणूक आयुक्तांची निवड प्रक्रिया, संपूर्ण निवडणूक प्रक्रियाच ताब्यात घेऊन जनतेला मूर्ख बनवणे आदी टीका दोन्ही नेत्यांनी केली. 'एसआयआर'च्या निमित्ताने काही गंभीर प्रश्न जनतेच्या मनात घर करू लागले आहेत, हे नाकारता येणार नाही. 'एसआयआर'च्या निमित्ताने निवडणूक आयोग 'एनआरसी' म्हणजे 'नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन'ची मोहीम राबवत असल्यासारखे त्याचे वर्तन आहे. या देशातील नागरिकत्व ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे नव्हे, गृहखात्याकडे आहे. त्यामुळे नावे वगळणे, त्यानंतर पुन्हा नवा मतदार म्हणून सहा क्रमांकाचा अर्ज भरायला लावणे, त्यात आई वा वडिलांच्या जन्माचा दाखला अनिवार्य करणे या मागे नक्की हेतू काय, याचे समाधानकारक स्पष्टीकरण आयोग देऊ शकलेला नाही. गोव्यातील ९७ मतदारांनी सगळ्या कागदपत्रांची काटेकोर पूर्तता केल्यानंतरही त्यांची नावे कशी वगळली गेली, असा प्रश्न उपस्थित केला गेला. त्या प्रक्रियेत केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार यादी संगणकीकृत करण्यासाठी जी प्रणाली तयार केली आहे, त्यातील दोष समोर आल्याने लोकांच्या मनातील संशय बळावणारच.

मुळात मुख्य निवडणूक आयुक्त निवडीच्या प्रक्रियेत, पंतप्रधान, विरोधी पक्षनेता व सरन्यायाधीश अशी अंतरिम तरतूद सर्वोच्च न्यायालयाने केली होती. त्यानंतर सरकारने नवा कायदा केला आणि त्यामध्ये सरन्यायाधीशांऐवजी गृहमंत्र्याना स्थान दिले त्यामुळे विरोधकांच्या मनात संशय निर्माण झाला आहे. न्यायाच्या प्रक्रियेत केवळ न्याय होणे महत्त्वाचे नसून, तो झाल्याचे दिसणेही महत्त्वाचे असते. लोकशाही प्रक्रिया राबवताना जे प्रशासकीय निर्णय घ्यावे लागतात त्यातही हेच सूत्र लागू पडते. यादीत सुधारणा होणे गरजेचे आहेच; कारण मतदार यादीत नाव समाविष्ट करणे जितके सोपे आहे, तितके त्यातून नाव वगळणे कठीण आहे. त्यामुळे दुबार मतदार, मृत व्यक्ती यांची नावे वगळायलाच हवीत. मात्र, प्रक्रियेबाबत जनतेच्या मनात संशय निर्माण होणार नाही हे पाहणे आयुक्तांचे व एका अर्थी सरकारचे काम आहे. देशभरातून ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात उठलेल्या आवाजाची दखल संबंधितांनी त्वरेने घेणे हेच सगळ्यांसाठी हितकारक ठरेल, हा या आंदोलनांचा सांगावा आहे.

पान १ वरून

## राज्यात दुष्काळाचा दाह वाढला!

१७ हजार हेक्टर क्षेत्रावरील नुकसानीचे पंचनामे करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे आणखी काही तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याची माहिती मंत्रिमंडळास देण्यात आली. त्यावेळी पाण्याचे नियोजन आतापासूनच करा, १० टक्के पाणी कपातीची राज्यभरात काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.

त्यानुसार शहरी व ग्रामीण भागात १० टक्के पाणीकपात लागू करण्यासोबतच, शेतकऱ्यांना कर्जवसुलीसाठी त्रास देणाऱ्या बँकांवर कारवाई करणे, चाऱ्याची टंचाई दूर करणे आणि दिवाळीपूर्वी मदत वाटपाचे नियोजन करण्याबाबत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय दुष्काळ निवारण उपाययोजना मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली संध्याकाळी झालेल्या बैठकीत घेण्यात आले.

जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील तसेच विविध विभागांचे सचिव आणि अधिकारी उपस्थित होते.

राज्यात सध्या ४५ टक्क्यांवर पंचनामे पूर्ण झाले आहेत. उर्वरित पंचनाम्यांचे काम जलद गतीने पूर्ण करुन कोणत्याही परिस्थितीत २० ऑक्टोबर पर्यंत पंचनामे पूर्ण करण्याचे आदेश बैठकीत देण्यात आले. तसेच पंचनाम्यासाठी ५ टक्के निधी वेगळा राखून ठेवण्याचे आदेशही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

शेतकऱ्यांना कर्जवाटप करताना बँकांकडून होणाऱ्या विलंबाबाबत मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष बावनकुळे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. बँकांच्या अडमुठ्या धोरणावर टीका करताना राज्यात आतापर्यंत केवळ ८ टक्केच पीक कर्जवाटप झाल्याचे सांगताना, बँकांनी शेतकऱ्यांकडे वारंवार कागदपत्रांची मागणी करू नये, एकदा पीक कर्ज घेतले असल्यास पुन्हा कागदपत्रे मागू नयेत, असे आदेश दिले. तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा खाजगी बँकेने अथवा खाजगी फायनान्सरने या काळात शेतकऱ्यांना कर्जभरण्यासाठी फोन करून वेठीस धरू नये. असे प्रकार घडल्यास कडक कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला. याप्रकरणी मुख्य सचिवांच्या स्तरावर तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय बैठका घेऊन प्रश्न सोडवण्याचे आदेश देण्यात आले.

शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कर्जमाफीतील वारसांच्या नोंदी आणि केवायसी गावनिहाय पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. कोणत्याही कारणाने शेतकरी लाभापासून वंचित राहता कामा नये आणि सर्व शेतकऱ्यांना विविध योजना लागू पडल्या पाहिजेत.

# दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक कोंडीत सरकार ट्रॅप तर प्रत्येक हालचालीत जनता ट्रॅक

केंद्र आणि राज्य सरकार सुरक्षा, पारदर्शकता आणि कर आकारणी अधिक मजबूत करण्यासाठी वेगवेगळ्या स्तरांवर विविध महत्त्वाच्या गोष्टींवर हायटेक आणि रिअल-टाइम मॉनिटरिंग म्हणजेच थेट देखरेख ठेवण्यास सुरुवात करणार आहे. महाराष्ट्र सरकार दुष्काळ आणि आर्थिक संकटामुळे लाडकी बहीण योजनेसह एकूण २६ प्रमुख लोककल्याणकारी योजना आणि २५ शासकीय धोरणांवर महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक') द्वारे भारतीय व्यवस्थापन शिक्षण संस्था मुंबई (आयआयएम मुंबई) च्या सहकार्याने रिअल-टाईम मॉनिटरिंग म्हणजेच थेट देखरेख करणार आहे. याशिवाय, माहिती आणि जनसंपर्क संचालनालय (डीआयपीआर) अंतर्गत प्रसारमाध्यमं, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियावरील सर्व प्रकारच्या सकारात्मक व नकारात्मक बातम्यांचे अवलोकन करण्यासाठी राज्य सरकारने स्वतंत्र मीडिया मॉनिटरिंग सेंटरची स्थापना केली आहे. ज्याद्वारे सरकारविरोधी किंवा शासनाशी संबंधित बातम्यांवर सतत नजर ठेवली जाते. सांगायचे तात्पर्य म्हणजे सध्या सरकारचा मुख्य भर हा सरकारी योजनांचा खर्च, दुष्काळी उपाययोजना आणि सोशल मीडियावरील बातम्या ट्रॅक करण्यावर आहे.

२६ प्रमुख लोककल्याणकारी योजना आणि २५ शासकीय धोरणांवर प्रत्यक्ष नजर ठेवून १.२० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीच्या खर्चाचा मागोवा घेतला जाणार आहे. आयकर विभागाकडून बँक खात्यांमधील मोठ्या रोख (कॅश) व्यवहारांवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार असल्याने वषार्ला १० लाख रुपयांपेक्षा जास्त कॅश डिपॉझिट किंवा विथड्रॉवल झाल्यास सरकारकडून नोटीस येण्याची शक्यता आहे. ५,००० रुपयांपेक्षा जास्त मूल्याचे सर्व डिजिटल व्यवहार आणि युपीआय ट्रान्झॅक्शन्सच्या रेकॉर्डवर सरकार लक्ष ठेवल्याने डिजिटल पेमेंट ट्रॅक होणार आहे. सुरक्षितता आणि संशयास्पद खातीच्या दृष्टीकोनातून करचुकवेगिरी किंवा संशयास्पद उत्पन्न आढळल्यास अधिकृत अधिका-यांना बँक खाती, ईमेल आणि क्लाउड स्टोरेज तपासण्याची परवानगी देण्यात येणार आहे.

प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल मीडियामधील बातम्यांवर लक्ष ठेवण्यासाठी १० कोटी रुपये खर्चून 'मीडिया मॉनिटरिंग सेंटर' स्थापन केले आहे. ज्याद्वारे सरकारविरोधातील नकारात्मक बातम्या आणि चुकीच्या माहितीवर (फेक न्यूज) लक्ष ठेवले जाणार आहे. गृह मंत्रालयाने (एमएचए) सायबर गुन्हेगारी आणि बेकायदेशीर कंटेंट रोखण्यासाठी फेसबुक, इंस्टाग्राम आणि युट्युब यांसारख्या प्लॅटफॉर्मवरील लाखो संशयास्पद लिंक्स आणि खात्यांवर मॉनिटरिंग वाढवून ते ब्लॉक करण्याचे आदेश दिले जाणार आहेत. पब्लिक ट्रान्सपोर्ट ट्रॅकिंग करण्याकरीता सार्वजनिक बसेस, टॅक्सी आणि इतर प्रवासी वाहनांमध्ये 'व्हीकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाईस' आणि पॅनिक बटन अनिवार्य करण्यावर सरकार विचार करत आहे. पॅनिक बटन दाबल्यास थेट राज्य सरकारच्या मॉनिटरिंग सेंटरला अलर्ट मिळतो. तसेच दिल्ली सरकारने प्रदूषणाचे स्रोत शोधण्यासाठी २४ तास चालणारे 'एआय-पावर्ड इंटीग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर' सुरू करत आहे. ज्याद्वारे कचरा जाळणे, बांधकामाची धूळ आणि रिअल-टाइम एअर क्वालिटी वर थेट नजर ठेवली जाणार आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील २६ योजना आणि २५ धोरणांचा फेरआढावा घेतला जाणार आहे. १.२० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या योजनांच्या अंमलबजावणीवर रिअल-टाइम मॉनिटरिंग केले जाणार आहे. महाराष्ट्रातील महिलांसाठी महत्त्वाची योजना असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकडे सध्या विशेष लक्ष लागले आहे. राज्यात दुष्काळ आणि पाणी-चारा टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारसमोर एकीकडे शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी मदतीची गरज आहे, तर दुसरीकडे मोठ्या खर्चाच्या योजनांचे आर्थिक नियोजन करण्याचे आवाहन आहे. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या २६ योजना आणि २५ धोरणांचा फेरआढावा घेतला जाणार आहे. या योजनांवर १.२० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक खचार्चा आवाका असल्याचे सांगितले जात आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांना आर्थिक मदत दिली जाते. त्यामुळे या योजनेसाठी राज्याच्या अर्थसंकल्पातून मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करावी लागते. आता दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी अतिरिक्त मदतीची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेसह मोठ्या खर्चाच्या योजनांचे आर्थिक नियोजन पुन्हा चर्चेत आले आहे. दुष्काळामुळे सरकारसमोर दुहेरी आवाहन असल्याने आणि २६ योजना नि २५ धोरणांचा फेरआढावा घेतला जाणार असल्याने लाडकी बहीण योजना बंद होणार का? लाडकी बहीण योजनेचा फेरआढावा घेतला जाणार का? दुष्काळामुळे लाडकी बहीण योजनेवर परिणाम होणार का? २६ योजनांचा फेरआढावा का घेतला जात आहे? यासारखी अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. योजनांची अंमलबजावणी, खर्च आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोच यांचे अधिक प्रभावी मॉनिटरिंग करण्यासाठी सरकारकडून राबवण्यात येणा-या २६ योजना आणि २५ धोरणांच्या अंमलबजावणीचा फेरआढावा घेतला जाणार आहे. या योजनांचा निधी योग्य पद्धतीने वापरला जात आहे का? योजना अपेक्षित परिणाम देत आहेत का? आणि त्याचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतो का? यावर लक्ष दिले जाणार आहे. यासाठी महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष अर्थात 'महा-टॅक' च्या माध्यमातून रिअल-टाइम मॉनिटरिंग व्यवस्था वापरण्यात येत आहे.

सध्या लाडकी बहीण योजना बंद करण्याचा अधिकृत निर्णय झाल्याचे यातून दिसत नाही. २६ योजना आणि २५ धोरणांचा फेरआढावा घेण्याचा अर्थ संबंधित योजना तातडीने बंद केल्या जातील किंवा त्यांचे पैसे थांबवले जातील, असा थेट निष्कर्ष काढता येत नाही. दुष्काळामुळे राज्याच्या आर्थिक नियोजनावर अतिरिक्त दबाव येऊ शकतो. मात्र योजनेच्या लाभांवर बदल होणार कि नाही हे निश्चित सांगता येत नाही. फेरआढाव्यात योजनांचा खर्च, अंमलबजावणी आणि लाभार्थ्यांपर्यंत पोहोच यांचा आढावा घेतला जाणार आहे. मराठवाडा आणि विदर्भातील पाणी व चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतक-यांसाठी मदतीची मागणी वाढत आहे. अशा परिस्थितीत सरकारला दुष्काळग्रस्त भागासाठी उपाययोजना करण्यासोबतच विविध कल्याणकारी योजनांसाठी निधीचे नियोजन करावे लागणार आहे. त्यामुळे पुढील काळात लाडकी बहीण योजनेसह मोठ्या आर्थिक आवाक्याच्या योजनांबाबत सरकार कोणते निर्णय घेते, याकडे महिलांसह सर्वांचे लक्ष राहणार आहे.

महाराष्ट्रात ऐन दुष्काळी परिस्थितीमुळे आणि ढासळत्या आर्थिक समीकरणांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकार ॲक्शन मोडवर आले आहे. महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक) स्थापन करण्याची गरज सरकारला का भासली? राज्याची आर्थिक स्थिती नेमकी कशी आहे? अर्थसंकल्प सादर करताना ४०,५५२ कोटींची महसुली तूट आणि १.५ लाख कोटींची राजकोषीय तूट अपेक्षित धरण्यात आली होती. त्यातच नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच तिमाहीत राज्य सरकारने तब्बल ९७ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. आधीच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना', शेतक-यांना मोफत वीज आणि आता कर्जमाफी... यामुळे राज्यावरील कजार्चा बोजा तब्बल ११ लाख कोटींवर गेला. केवळ कजार्चे व्याज फेडण्यासाठी यावर्षी ७० हजार कोटींचा विक्रमी खर्च होणार आहे. अशा बिकट आर्थिक परिस्थितीत दुष्काळी उपाययोजना करण्यासाठी सरकारला आणखी कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही. याच पार्श्वभूमीवर १.२० लाख कोटींपेक्षा जास्त खर्चाच्या योजनांचं थेट मूल्यमापन करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. मात्र, महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक) द्वारे कोणत्या योजनेचं आणि धोरणांचे मूल्यमापन होणार? आणि कसे होणार?

उद्योग, आयटी, इलेक्ट्रिक वाहन, ग्रीन हायड्रोजन, पर्यटन, गृहनिर्माण आणि महिला धोरण यासह २५ प्रमुख धोरणांचे, १.२० लाख कोटींच्या २६ प्रमुख योजनांचे दर तिमाही समांतर मूल्यमापन होणार...योजनांचा लाभ वेळेत आणि योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचतो का? खर्चाची गुणवत्ता आणि निरुपयोगी मालमत्ता यांचा आढावा, विविध विभागांमधील भ्रष्टाचाराचे छुपे मार्ग शोधून ते बंद करण्यासाठी ठोस निर्णय, मुख्यमंत्री कार्यालयाला थेट लाईव्ह डॅशबोर्ड आणि तिमाही अहवाल सादर करणं बंधनकारक असणार आहे. एकीकडे दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी अडचणीत आहेत, तर दुसरीकडे तिजोरीवर ११ लाख कोटींचा डोंगराएवढा कजार्चा भार राज्यावर आहे. मात्र मुख्यमंत्र्यांचे थेट या खर्चिक योजनांवर लक्ष असल्याने प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. अशा स्थितीत १.२० लाख कोटींच्या योजनांचा 'महा-टॅक' द्वारे घेतला जाणारा हा फेरआढावा सरकारी पैशांची उधळपट्टी थांबवेल की लाडकी बहीण सारख्या लोकप्रिय योजनांना कात्री लावेल याची उत्सुकता आहे.

**- सुनील शिरपुरे**
कमळवेल्ली, यवतमाळ
भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१

## दक्षता समितीच्या सदस्यांची माहिती दर्शविणारे बोर्ड प्रत्येक पोलीस ठाण्यात लावावेत - जिल्हाधिकारी कार्तिकेयन



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय दक्षता व नियंत्रण समित्यांच्या सदस्यांची माहिती नागरिकांना सहज उपलब्ध व्हावी, यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात समितीच्या सदस्यांची नावे दर्शविणारे डिजिटल बोर्ड लावण्याबाबत समाज कल्याण विभागाने आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय दक्षता व नियंत्रण समितीतील शासकीय अधिकारी-कर्मचारी तसेच अशासकीय सदस्य हे लोकसेवक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी परस्परांमध्ये योग्य समन्वय ठेवून पीडितांना शासनाच्या योजनांचा व कायद्यानुसार मिळणाऱ्या लाभांचा तातडीने लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

समितीतील सर्व अशासकीय सदस्यांना संबंधित कायदे, नियम, शासन निर्णय तसेच समितीच्या कामकाजाची सविस्तर माहिती असणे आवश्यक आहे. सदस्यांना संबंधित कायदे व तरतुदींची योग्य माहिती असल्यास ते पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी अधिक प्रभावी भूमिका बजावू शकतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तालुकास्तरीय दक्षता व नियंत्रण समितीच्या सदस्यांची निवड आदर्श आचारसंहितेनंतर करण्यात येणार असल्याने समाज कल्याण विभागाने त्यादृष्टीने आवश्यक नियोजन करावे, असे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी दिले.

जिल्ह्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत दि. ३१ डिसेंबर २०२५ अखेरची ४९ प्रकरणे प्रलंबित होती. दि. १ जानेवारी २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत एकूण २२४ प्रकरणे दाखल झाली असून, एकूण २७३ प्रकरणांपैकी २२४ प्रकरणांमध्ये कार्यवाही करण्यात आली आहे. सध्या ४९ प्रकरणे प्रलंबित असून, त्यापैकी शहर पोलीस विभागांतर्गत ६ तर ग्रामीण पोलीस विभागांतर्गत ४३ प्रकरणे प्रलंबित आहेत. पोलीस विभागाकडे तपासासाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये तातडीने तपास पूर्ण करून आरोपपत्र दाखल करावे व त्याबाबतची माहिती समाज कल्याण विभागास सादर करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

बैठकीत पोलीस विभागाकडे दाखल व तपासावर प्रलंबित प्रकरणे, सप्टेंबर २०२६ अखेर दाखल झालेली खून व गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांची प्रकरणे, न्यायालयीन निर्णयासाठी प्रलंबित प्रकरणे तसेच अर्थसहाय्याच्या मंजुरीसाठी प्राप्त प्रस्ताव आणि उपलब्ध निधीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. याबाबत जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या.

गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांतील प्रकरणांमध्ये पोलीस विभाग व समाज कल्याण विभागाने संबंधित दक्षता समितीच्या सदस्यांना आवश्यक माहिती द्यावी, असेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

शेटफळ, ता. मोहोळ येथील एका प्रकरणात पीडिताच्या घराचे सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीची भरपाई मिळण्यासाठी विशेष बाब म्हणून शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी समाज कल्याण विभागाला दिले.

प्रारंभी समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीअंतर्गत विविध प्रकरणांची माहिती बैठकीत सादर केली.

दरम्यान, अशासकीय सदस्यांनी प्रत्येक पोलीस ठाण्यात तालुका व जिल्हास्तरीय दक्षता व नियंत्रण समितीतील अशासकीय सदस्यांची नावे दर्शविणारे डिजिटल बोर्ड लावण्यात यावेत, अशी मागणी केली. तसेच गुन्हा करून फरार असलेल्या आरोपींच्या अटकेसाठी पोलीस विभागाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणीही सदस्यांनी केली.

यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे, पंढरपूरचे प्रांताधिकारी सचिन इथापे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड तसेच अशासकीय सदस्य अरुण क्षीरसागर, विजय बनसोडे, मोहन गायकवाड, सुदर्शन यादव, जितेंद्र बनसोडे यांच्यासह शहर पोलीस विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# विधानपरिषद पदवीधर निवडणूकीत असे करा मतदान

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीची मतदान पद्धती आणि आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या अन्य सार्वत्रिक निवडणुकातील मतदानाची पद्धती यात मूलभूत फरक आहे. विधानपरिषद निवडणूकीचे मतदान हे मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावापुढे पसंतीक्रम नोंदवून घेण्यात येते. जितके उमेदवार निवडणूक लढवित असतील अशा सर्वांपुढे पसंतीक्रम नोंदविता येतो. मतदानाच्या या वेगळ्या पद्धतीमुळे मतदारांनी आणि विशेषतः प्रथमच मतदान करणाऱ्यांनी ही पद्धत जाणून योग्यरितीने मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले आहे.

### असे करा मतदानः

मतदान करण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने मतपत्रिकेबरोबर पुरवलेले जांभळ्या रंगाचे स्केच पेनच वापरावे. अन्य कोणतेही पेन, पेन्सिल, बॉलपॉईन्ट पेन किंवा अन्य कोणतेही लेखनाचे साधन मतदानासाठी वापरु नये. असे केल्यास तुमची मतपत्रिका अवैध ठरेल.

उमेदवाराच्या नावाच्या स्तंभासमोर पसंतीक्रम म्हणून असलेल्या स्तंभामध्ये तुम्ही प्रथम पसंतीचा उमेदवार म्हणून निवडलेल्या उमेदवाराच्या नावासमोर १ असा आकडा लिहून मतदान करा. हा १ हा आकडा फक्त एकाच उमेदवाराच्या नावासमोर द्यावा. एकापेक्षा अधिक उमेदवारांची निवड करावयाची असली तरीदेखील १ हा आकडा फक्त एकाच उमेदवाराच्या नावासमोर घाला.

निवडून द्यावयाच्या उमेदवारांची संख्या विचारात न घेता जेवढे उमेदवार निवडणूक लढवत असतील तेवढे पसंतीक्रम तुम्हाला देता येतील. उदाहरणार्थ, पाच उमेदवार निवडून द्यावयाचे



असतील तरीही तुम्हाला तुमच्या निवडीच्या पसंतीक्रमाने उमेदवारांच्या नावासमोर १ ते ५ असे आकडे घालता येतील. उर्वरीत उमेदवारांबाबतचा तुमचा पुढील पसंतीक्रम, अशा उमेदवारांच्या नावासमोर असलेल्या पसंतीक्रम या स्तंभामध्ये तुमच्या पसंतीक्रमानुसार २, ३, ४ इत्यादी आकडे घालून दर्शवा.

कोणत्याही उमेदवाराच्या नावासमोर आपण फक्त एकच आकडा घातलेला आहे याची खात्री करून घ्यावी. तसेच तोच आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर घातलेला नाही याची देखील खात्री करुन घ्यावी. पसंतीक्रम फक्त १, २, ३ इत्यादी आकड्यांमध्येच दर्शवावा. एक, दोन, तीन इत्यादी शब्दांमध्ये दर्शवू नये. पसंतीक्रमाचे आकडे भारतीय अंकाच्या 1, 2, 3 इत्यादींसारख्या आंतरराष्ट्रीय रुपात किंवा क क्क क्कइत्यादींसारख्या रोमन रुपात किंवा १, २, ३ अशा देवनागरी रुपात किंवा संविधानाच्या अनुसूची आठमधील मान्यता दिलेल्या कोणत्याही एका भारतीय भाषेमध्ये वापरण्यात येणाऱ्या रुपामध्ये चिन्हांकित करता येतील.

मतपत्रिकेवर मतदाराने आपले नाव, आद्याक्षरे किंवा अन्य शब्द लिहू नयेत किंवा स्वाक्षरी करु नये. तसेच आपल्या अंगठ्याचा ठसा देखील उमटवू नये. असे केल्यास आपली मतत्रिका अवैध ठरेल.

पसंतीक्रम दर्शविण्यासाठी तुमच्या निवडीच्या उमेदवाराच्या नावासमोर √ किंवा अशी खूण करणे पुरेसे होणार नाही. अशा मतपत्रिका बाद करण्यात येतील. पसंतीक्रम फक्त आकड्यांमध्येच दर्शवावा.

आपली मतपत्रिका वैध ठरण्यासाठी एकूण उमेदवारांपैकी एका उमेदवारासमोर १ हा आकडा लिहून तुमची पहिली पसंती दर्शवणे आवश्यक आहे. इतर पसंतीक्रम देणे ऐच्छिक आहेत. म्हणजेच इच्छेनुसार दुसरी किंवा पुढील पसंती दर्शवावी अथवा दर्शवू नये.

### अशा मतपत्रिका अवैध ठरतीलः

१ हा आकडा घातलेला नसल्यास. १ हा आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर घातलेला असल्यास. १ हा आकडा, तो कोणत्या उमेदवाराला देण्यासाठी घातलेला आहे याबाबत शंका निर्माण होईल अशाप्रकारे घातलेला असेल. एकाच उमेदवाराच्या नावासमोर १ आणि त्याबरोबर २, ३ इत्यादी आकडे देखील घातलेले असतील. पसंतीक्रम आकड्याऐवजी शब्दांमध्ये दर्शवलेला असेल. मतदाराची ओळख पटू शकेल अशी कोणतीही खूण किंवा लेखन असले, आणि असे आकडे घालण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने दिलेल्या जांभळ्या रंगाच्या स्केच पेन व्यतिरिक्त अन्य साधनाने कोणताही आकडा घातलेला असेल, तरी अशी मतपत्रिका अवैध ठरेल.

## वात्रटिका

### विद्यार्थी आंदोलन

बोलावले नाही तरी
स्वतःहून हजर होतात...
विद्यार्थी रोष वाढतो आणि
फटफजिती करून घेतात...
मागितला नाही पाठींबा
तरी चढाओढ सुरू आहे...
हवं ते मिळवतो विद्यार्थी
तोच आता खरा गुरू आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# दहशत माजवणारे सराईत चोरटे जेरबंद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हातात शस्त्र बाळगून शहरात दहशत माजवणाऱ्या आणि दुचाकी चोऱ्या करणाऱ्या एका सराईत गुन्हेगारासह त्याच्या साथीदाराला जेरबंद करण्यात एम.आय.डी.सी. पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला मोठे यश आले आहे.

पोलिसांनी अटक केलेल्या या आरोपींकडून तीन लाख ९५ हजार रुपये किमतीच्या एकूण ८ चोरीच्या मोटारसायकली हस्तगत केल्या. याबाबत पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी अधिक माहिती दिली.

एक ऑक्टोबर रोजी दुपारी एम.आय.डी.सी. गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक अल्फाज शेख यांना माहिती मिळाली की, अक्कलकोट रोडवरील गदगीनगर भागात दोन इसम हातात कोयता घेऊन दहशत माजवत फिरत आहेत. लागलीच गुन्हे प्रकटीकरण पथकाने तातडीने सापळा रचून सैफन ऊर्फ सोहेल नूरउद्दीन बागवान (वय २७, रा. किसान नगर, सोलापूर) आणि मोहन नागनाथ साळुंखे (वय ४३, रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी दोघांनी मिळून शहरातून आठ मोटारसायकलींची चोरी केल्याची कबुली दिली.

आरोपींनी चोरी केलेल्या या दुचाकी अक्कलकोट रोडवरील राजीव नगर भागातील मैदानातील पडक्या इमारतीजवळ, झाडीझुडपात लपवून ठेवल्या होत्या त्या पोलिसांनी जप्त केल्या. पकडण्यात आलेल्या आरोपींपैकी मोहन नागनाथ साळुंखे हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर सोलापूर शहरात मोटार सायकल चोरी, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे आणि महिलांविषयक गुन्हे असे एकूण २० गंभीर गुन्हे दाखल आहेत तर दुसरा आरोपी सैफन उर्फ सोहेल याच्यावर ८ गुन्हे दाखल आहेत दोघांवर एम.आय.डी.सी. पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त प्रितम यावलकर, सहाय्यक आयुक्त अरुण देवकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी. एस. बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक अल्फाज शेख, पोलीस अंमलदार राकेश पाटील, एकनाथ उबाळे, संदीप जावळे, सचिन भांगे, आमसिद्ध निंबाळ, नागेशसिंह चव्हाण, सचिनकुमार लवटे, सुहास अर्जुन, अमरसिंग शिवशिंगवाले, कुमार बोल्ली, अजित माने, सकलेन मुकादम, अविनाश दिघोळे व अमोल खरातमल यांनी बजावली.

# सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ८०० निवृत्तीवेतनधारकांचा कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतनाशी संबंधित विविध सेवा व माहिती अधिक सुलभपणे डिजिटल माध्यमातून उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या लेखा व कोषागारे विभागामार्फत 'Maha-UPLABDHI' (महा-उपलब्धी) मोबाईल ॲप सुरू करण्यात आले आहे. या ॲपबाबत जिल्हा कोषागार कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने निवृत्तीवेतनधारकांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. जिल्हा कोषागार अधिकारी वैभव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेस सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ८०० निवृत्तीवेतनधारकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यशाळेत लेखा व कोषागारे विभागाच्या सचिव श्रीमती रिचा यागला तसेच संचालक, लेखा व कोषागारे श्रीमती दीपा देशपांडे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन केले. 'महा-उपलब्धी' ॲपच्या विविध सुविधा, त्याचा वापर करण्याची पद्धत तसेच डिजिटल माध्यमातून निवृत्तीवेतनविषयक सेवा प्राप्त करण्याबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती देण्यात आली.

निवृत्तीवेतनधारकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती असल्याने कार्यशाळेचे दोन सत्रांमध्ये आयोजन करण्यात आले. प्रत्येक सत्रात सुमारे ४०० निवृत्तीवेतनधारकांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी ॲपबाबत उत्सुकतेने माहिती जाणून घेतली तसेच विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

कार्यशाळेस सोलापूर जिल्ह्यातील विविध निवृत्तीवेतनधारक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी विविध संघटनांच्या प्रतिनिधींचा प्रतिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला. 'महा-उपलब्धी' ॲप तसेच निवृत्तीवेतनधारकांसाठी आयोजित कार्यशाळेबाबत संघटनांच्या प्रतिनिधींनी समाधान व्यक्त केले. निवृत्तीवेतनविषयक सेवा डिजिटल माध्यमातून मोबाईलवर उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम निवृत्तीवेतनधारकांसाठी उपयुक्त व सोयीचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

**ॲपवर नोंदणी न झाल्यास निवृत्तीवेतन सेवांवर परिणाम नाही**

जिल्हा कोषागार अधिकारी वैभव राऊत यांनी उपस्थित निवृत्तीवेतनधारकांना आवाहन केले की, तांत्रिक अडचणींमुळे किंवा स्मार्टफोन उपलब्ध नसल्यामुळे एखाद्या निवृत्तीवेतनधारकास 'महा-उपलब्धी' ॲपवर नोंदणी करता आली नाही, तरी त्यांची निवृत्तीवेतनाशी संबंधित कोणतीही सेवा बंद होणार नाही किंवा त्यावर कोणताही परिणाम होणार नाही. निवृत्तीवेतनविषयक सेवा पूर्वीप्रमाणेच सुरळीत सुरू राहतील.

ॲपवर नोंदणी न झाल्याबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच निवृत्तीवेतनासंदर्भात अनधिकृत स्रोतांकडून अथवा अप्रमाणित माध्यमातून प्राप्त होणाऱ्या माहितीवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीसाठी जिल्हा कोषागार कार्यालय किंवा तालुका उपकोषागार कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही राऊत यांनी स्पष्ट केले.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी जिल्हा कोषागार अधिकारी वैभव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन सहायक संचालक रोहन जाधव, परिविक्षाधीन सहायक संचालक नितीन कानवट, अपर कोषागार अधिकारी रणजित कदम, रामकृष्ण डंके, निलेश साखरे यांच्यासह जिल्हा कोषागार कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सुमारे ८०० निवृत्तीवेतनधारकांचा सहभाग, विविध निवृत्तीवेतनधारक संघटनांच्या प्रतिनिधींची उपस्थिती आणि मिळालेला सकारात्मक प्रतिसाद यामुळे कार्यशाळा उत्स्फूर्त वातावरणात पार पडली. निवृत्तीवेतनविषयक सेवा डिजिटल माध्यमातून अधिक सुलभपणे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने 'महा-उपलब्धी' ॲप हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा चुकीचा इतिहास खपवून घेणार नाही - संभाजी ब्रिगेड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी संभाजी ब्रिगेडने दणका दिल्यानंतर कीर्तनकारालाअखेर माफी मागावी लागली. परिवाराच्या वतीने जुळे सोलापूर येथील जामगुंडी मंगल कार्यालय येथे श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह सुरू आहे. या कार्यक्रमात कीर्तनकार अनंतशास्त्री मुळेगोंदीकर महाराज यांनी समर्थ रामदास आणि शिवाजी महाराजांची भेट झाली नसताना, उच्च न्यायालयाच्या आदेशाला डावलून 'शिवाजी महाराजांनी समर्थांची माफी मागितली' असे चुकीचे उद्गार काढले.

हा प्रकार समजताच संभाजी ब्रिगेड सिद्धेश्वर फाऊंडेशन आणि जामगुंडी आक्रमक झाली. जिल्हाध्यक्ष अतुल जाधव, शहराध्यक्ष अमोल भोसले, कार्याध्यक्ष सचिन गायकवाड, तानाजी पवार, विशाल कदम, नितीन शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जामगुंडी मंगल कार्यालयासमोर प्रतिमेला जोडे मारो आंदोलनाचा इशारा देण्यात आला. या दणक्यानंतर विजापूर नाका पोलीस स्टेशन येथे आयोजकांनी दिलगिरी व्यक्त केली आणि अनंतशास्त्री महाराजांनी व्यासपीठावरून तमाम शिवभक्तांची जाहीर माफी मागितली. छत्रपतींचा अपमान खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा संभाजी ब्रिगेडने दिला आहे.

# सेवा संकल्प अभियान अंतर्गत 'तिशीचा पल्ला; तपासणी अन सल्ला'



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** बदलत्या जीवनशैलीमुळे वाढणाऱ्या असंसर्गजन्य आजारांवर वेळेत नियंत्रण मिळवण्यासाठी सोलापूर जिल्हा आरोग्य विभागाच्यावतीने १ सप्टेंबर २०२६ ते १० डिसेंबर २०२६ या कालावधीत 'तिशीचा पल्ला, तपासणी अन सल्ला' हे १०० दिवसांचे विशेष अभियान राबवले जात आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील ३० वर्षांवरील सर्व नागरिकांची घरोघरी तसेच आरोग्य केंद्रांवर मोफत तपासणी केली जात आहे.

मधुमेह (Diabetes), उच्च रक्तदाब (Hypertension) आणि तोंड, स्तन व गर्भाशय मुखाचा कर्करोग (Cancer) यांचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान करून रुग्णांना वेळेत उपचार मिळवून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

**अभियानाची ठळक वैशिष्ट्ये आणि आतापर्यंतची कामगिरी:**

घरोघरी आरोग्य सर्वेक्षण: गाव, वाडी आणि वस्ती पातळीवर आशा स्वयंसेविका, एएनएम (ANM), एमपीडब्ल्यू (MPW) आणि समुदाय आरोग्य अधिकारी (CHO) यांची विशेष पथके प्रत्यक्ष भेट देऊन नागरिकांची आरोग्य तपासणी करत आहेत.

१.४६ लाखांहून अधिक नागरिकांची तपासणी: जिल्ह्यात आतापर्यंत ३० वर्षांवरील १,४६,७११ लाभार्थ्यांची मोफत तपासणी पूर्ण झाली आहे.

उच्च रक्तदाब व मधुमेह निदान: तपासणीदरम्यान ९,७०४ रुग्णांमध्ये उच्च रक्तदाब तर ८,०९९ रुग्णांमध्ये मधुमेह आढळून आला असून त्यांच्यावर तत्काळ उपचार सुरू करण्यात आले आहेत.

**कर्करोग संशयित तपासणी व संदर्भ सेवा:**

मुखाचा कर्करोग: ३९,३८० जणांची तपासणी झाली असून, १५२ संशयितांना पुढील तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे.

स्तन कर्करोग: १८,९७९ महिलांची तपासणी झाली असून, ६२ संशयित महिलांना संदर्भित करण्यात आले आहे.

गर्भाशय मुख कर्करोग: १८,१३० महिलांची यशस्वी तपासणी पूर्ण झाली आहे.

प्रगत व मोफत उपचार सुविधा: लक्षणे आढळणाऱ्या रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालय किंवा जिल्हा रुग्णालयात संदभार्साठी (Referral) पाठवले जात आहे. तेथे विशेषतज्ज्ञांमार्फत मॅमोग्राफी, बायोप्सी आणि FNAC यांसारख्या अत्याधुनिक तपासण्या पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# अभिजात मराठी ही महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख- मंत्री उदय सामंत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक इतिहासातील महत्त्वाचा टप्पा असून, अभिजात मराठी ही महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे, असे प्रतिपादन उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केले. विद्यार्थ्यांनी आपल्या हक्कांसाठी लढताना कोणत्याही राजकीय पक्षाने अथवा नेत्याने स्वाथार्साठी आपला वापर करून घेऊ नये, तसेच सोशल मीडियावरील संवादातही भाषेची मयार्दा, संयम आणि संस्कार जपावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या वतीने आणि विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अभिजात मराठी भाषा सप्ताह २०२६' अंतर्गत आयोजित 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खासदार ज्योती वाघमारे, आमदार सुभाष देशमुख, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. कर्नल प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, मराठी भाषा विभागाच्या संचालक शामकांत देवरे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. दिवाकर कुलकर्णी, अधिष्ठता डॉ. महेश खरात, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकाडे यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी आणि महाराष्ट्र शासनाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री सामंत म्हणाले की, महाराष्ट्राची संस्कृती संयम, आदर आणि संस्कारांची आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आणि तरुणांनी सोशल मीडियाचा वापर करताना भाषेची सभ्यता आणि सामाजिक भान जपले पाहिजे. आज मोबाईल, गुगल आणि चॅट जीपीटीच्या युगात कोणत्याही माहितीची क्षणार्धात पडताळणी करता येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना सत्य, वस्तुनिष्ठ आणि विश्वासार्ह ज्ञान देणे ही शिक्षणव्यवस्थेची जबाबदारी असल्याचे सामंत यांनी नमूद केले.

एमपीएससी परीक्षांमध्ये पारदर्शकता राखणे आणि पेपरफुटी रोखणे याबाबत शासनाची भूमिका ठाम असल्याचे सामंत यांनी सांगितले. सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त ११ तालुक्यांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी होत आहे की नाही, याची तपासणी करण्याच्या सूचना कुलगुरूंना दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्जाच्या वसुलीसाठी बँकांनी सक्ती करू नये, अशी सूचनाही त्यांनी केली.



**सोलापुरात मोठा उद्योग आणण्याचे आश्वासन**

सोलापूरच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी एमआयडीसीमध्ये मोठा उद्योग आणण्याची गरज असून, आचारसंहिता संपल्यानंतर विद्यार्थ्यांशी चर्चा करून याबाबत पुढाकार घेऊ, असे आश्वासन उदय सामंत यांनी दिले. स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण झाल्यास सोलापूरच्या तरुणांचे पुणे, मुंबई, बंगळुरू आणि हैदराबादकडे होणारे स्थलांतर कमी होण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले.

खासदार ज्योती वाघमारे यांनी सोलापुरातील तरुणांना रोजगारासाठी मोठ्या शहरांकडे स्थलांतर करावे लागू नये, यासाठी स्थानिक पातळीवर मोठे उद्योग उभारण्याची गरज व्यक्त केली. उद्योगांच्या अभावामुळे शहराची लोकसंख्या घटत असून सोलापूर 'वृद्धांचे शहर' बनत चालल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. सोलापूर एमआयडीसीमध्ये मोठा उद्योग सुरू करण्यासाठी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

कुलगुरू डॉ महानवर म्हणाले की, विद्यापीठात सध्या १४६ कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम सुरू असून, १३ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी हे अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत. विद्यापीठात मराठी भाषा तसेच वांग्मय संकुल सुरू आहे. त्यात आठ भाषेचे शिक्षण दिले जाते. जिल्ह्यातील सुमारे ३५ हजार विद्यार्थी व शिक्षक ऑनलाइन माध्यमातून या कार्यक्रमाशी जोडले गेल्याची माहिती कुलगुरू प्रा. कर्नल प्रकाश महानवर यांनी दिली.

**ग्रंथदिंडीने सप्ताहाचा प्रारंभ**

'अभिजात मराठी भाषा सप्ताह २०२६' अंतर्गत विद्यापीठाच्या अहिल्याभवन व नवीन प्रशासकीय इमारतीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळच्या सत्रात ग्रंथदिंडी काढण्यात आली. ग्रंथदिंडीचे पूजन कुलगुरू प्रा. कर्नल प्रकाश महानवर यांच्या हस्ते, तर ग्रंथपूजन प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अधिष्ठाता डॉ. महेश खरात, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकाडे यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक आणि विद्यार्थी सहभागी झाले.

मराठी राज्य विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

**मराठी भाषा सामाजिक समरसतेची वाहक**

'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या विषयावरील विशेष व्याख्यानात सामाजिक कार्यकर्ते डॉ. दिवाकर कुलकर्णी यांनी मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून सामाजिक समरसता आणि सांस्कृतिक वारशाची वाहक असल्याचे सांगितले. सोलापूर शहरात विविध भाषा बोलल्या जात असून, भारतीय विचारांची विविधता हीच भारताच्या एकतेची ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले.

संतपरंपरा ही लोकशाहीची खरी पायाभूत परंपरा असून, मराठी साहित्याचा अभिमान प्रत्येकाने बाळगला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. मराठी भाषा जिवंत आणि समृद्ध ठेवण्यात पत्रकारितेचा मोठा वाटा असल्याचे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून केलेल्या मराठी भाषेच्या सेवेचाही त्यांनी उल्लेख केला. ग्रामीण तसेच दलित साहित्यामुळे मराठी साहित्यविश्व अधिक समृद्ध झाले असून, नव्या पिढीने मराठीतील समृद्ध शब्दसंपत्ती जपली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

**सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगली मैफल**

'अभिजात मराठी सन्मान' कार्यक्रमात गायक अभिजीत कोसंबी आणि प्रसन्नजित कोसंबी यांच्या गायनाची मैफल तसेच विविध नृत्य सादरीकरण झाले. 'माऊली माऊली', 'भेटला विठ्ठल माझा' आणि 'गाव जागवत आली वासुदेवाची स्वारी' आदी गीतांनी उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे निवेदन अभिनेते दिगंबर नाईक यांनी केले. मराठी भाषेवरील प्रेम आणि योगदानाबद्दल विविध पुरस्कारांनी सन्मानित विमलताई माळी यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. विद्यापीठाच्या सांस्कृतिक विभागाने राष्ट्रीय पातळीवर मिळवलेल्या यशाचे मंत्री उदय सामंत यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे आणि श्रुती देवळे यांनी केले, तर आभार डॉ. केदारनाथ काळवणे यांनी मानले.

# नेताजी प्रशालेच्या शिवा हडपदला सॉफ्ट टेनिसमध्ये सुवर्णपदक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निलमनगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी शिवा हडपद याने शहरस्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले असून त्याची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सोलापूर महानगरपालिका, जिल्हा क्रीडा कार्यालय व सॉफ्ट टेनिस असोसिएशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर ही स्पर्धा पार पडली. १९ वर्षाखालील गटात शिवाने दमदार कामगिरी करत सुवर्णपदकावर नाव कोरले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे क्रीडा क्षेत्रातून त्याचे कौतुक होत आहे. त्याला प्रशालेचे क्रीडा शिक्षक विठ्ठल कुंभार व अशोक पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल प्राचार्य रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकवृंदांनी त्याचे अभिनंदन केले.


## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क -
शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस
रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने** मो. 9353370779
**रेखा बर्वे** मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) छ. शिवरायांवर आधारित रणजित देसाई लिखित कादंबरी २) कलर (मराठीत) ३) प्राथमिक शालेय पुस्तकांचे प्रकाशन करणारी संस्था ४) फळातील गोड द्रव ५) एक औषधी लाल रंगाचे कंदमूळ ६) बोलावण्यासाठीची आरोळी ७) धावपट्टू (इंग्रजीत) ८) भाजप नेते रावसाहेब दानवे या जिल्ह्यातील आहेत ११) पडीक जमीन १२) ग्राम, खेडे १३) लोक, रयत १५) श्रीगणेशाचे एक नाव १७) गुणाकारच्या विरूध्दार्थी शब्द १८) वत उलट लिहा २०) स्वभावाने रागीट २२) विषमच्या विरूध्दार्थी शब्द २४) रक्तवाहिनी २६) शिर्डी येथील प्रसिध्द देवस्थान २७) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष संक्षिप्तमध्ये लिहा-*** २९) डांबरी रोड ३०) फिरकी गोलंदाज-यजुवेंद्र *** ३२) उत्सवाचा दिवस ३४) धांदल, गडबड ३५) कर्ज (इंग्रजीत) ३६) भाजप नेत्या-उमा *** ३८) शर्ट ३९) ब्रेड (मराठीत) ४१) मध्य मुंबईतील एक रेल्वे स्टेशन, जिना ४२) अफूप्रमाणे एक अंमली पदार्थ ४३) झाडाचे पर्ण ४४) जय-पराजय, हार-** ४५) प्रख्यात दिवंगत गायिका-** मंगेशकर ४७) याच्यापासून शिरा बनवितात

**आडवे शब्द :** १) शिवसेनेचे महाराष्ट्रातील एक खासदार
५) लालूप्रसाद मुख्यमंत्री होते ते राज्य ९) शोध, तपास १०) सल उलट लिहा
११) लगेच, लवकर १२) फळातील मुख्य गर
१३) एक म्हण-नाकापेक्षा मोती ** १४) नव्वदच्या दशकातील एक अभिनेत्री-*** टंडन १६) देवतांनी दिलेला आशिर्वाद १७) शिजवलेला तांदूळ
१९) श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेशपर ग्रंथ-भगवत ** २१) आ. सुमनताई पाटील यांचा विधानसभा मतदारसंघ २३) नय उलट लिहा
२५) ओंजळ २८) याचे कणीस भाजून खातात २९) सत्वयुक्त, पौष्टीक
३०) बसण्यासाठी ही अंथरतात ३१) सक उलट लिहा ३३) लहानपण
३५) संसदेचे एक सभागृह ३७) बगिचा ३८) घर, निवास
४०) इराकची राजधानी ४२) गव्हाच्या पिठापासून बनवितात ती गोल ***
४४) प्राणप्रिय मित्र, जवळचे नाते ४६) दोघांमध्ये पडलेले अंतर, भेग (हिंदीत)
४८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत)
४९) एक हिंदी चित्रपट-** मचाये शोर, चोऱ्या करणारा
५०) वडिलार्जित संपत्तीचा हक्कदार
५१) उन्हाळ्यातील एक महिना

## सुडोकु - 71

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 1 | | | 3 | 9 | | 6 |
| | | 9 | | | 7 | 8 | 5 | |
| 2 | 5 | | 1 | | | 4 | 7 | |
| 5 | | | | 6 | 1 | 7 | | 4 |
| 7 | 6 | | 8 | 3 | | | | |
| | 3 | 2 | | | | | | |
| | 2 | | | 1 | 9 | 5 | | |
| | | 5 | | | | 3 | | 2 |
| | | | 4 | 5 | 2 | 1 | 9 | 7 |


**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**

**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**

**संपर्क - 9422602337, 8317212037**

# पत्रकारांच्या गृह प्रकल्पासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार - महापौर कोंड्याल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरात देशातील ऐतिहासिक असा पहिलाच गृहप्रकल्प सोलापुरात केवळ पत्रकारांसाठी उभारण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून म्हाडा अंतर्गत हा प्रकल्प साकारला जात आहे. अनेक वर्षांची पत्रकारांची स्वप्नपूर्ती होत आहे. यामुळे या गृह प्रकल्पासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार आहे, अशी ग्वाही महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली.

विजापूर रस्त्यावरील पत्रकार भवनालगत उभारण्यात येत असलेल्या पत्रकारांच्या गृह प्रकल्पास आज दुपारी महापौर विनायक कोंड्याल यांनी भेट दिली. प्रकल्पातील सर्व इमारती व सोयी सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महापालिकेचे उपअभियंता रौफ सरकाजी, उप अभियंता इदायत मुजावर, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, उपाध्यक्ष उमेश कदम, रामेश्वर विभुते, बाळकृष्ण दोड्डी, विकास कस्तुरे, विक्रांत कालेकर, संगमेश जेऊरे, आमसिद्ध व्हनकोरे, अमोल कांबळे, योगेश कल्याणकर, कादर शेख, राजू बंडगर, महादेव मादगुंडी, भास्कर अल्ली आदींसह पत्रकार उपस्थित होते. याप्रसंगी दैनिक तरुण भारत संवादचे संपादक विजयकुमार देशपांडे, पत्रकार विनोद कामतकर यांच्या हस्ते महापौर कोंड्याल व अधिकाऱ्यांचा स्वागत सत्कार करण्यात आला.

महापौर कोंड्याल पुढे म्हणाले, पत्रकारांच्या गृह प्रकल्पाचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने झालेलं आहे. सर्वांना सुख-सोयी मिळाव्यात अशा दृष्टिकोनातून हा प्रकल्प साकारला जात आहे. पत्रकारांनी जे स्वप्न बघितलं होतं ते स्वप्न साकारत आहे. पुणे-मुंबईमध्ये आपलं घर असायला पाहिजे अशा पद्धतीचं काही लोकांचे स्वप्न असतात तरीदेखील सोलापूरमध्ये आपल्या माय-माती सोलापूरमध्ये अतिशय हक्काचं, स्वतःचं हक्काचं घर आज या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून साकार होत आहे. याचा मनस्वी आनंद होत आहे, असे ते म्हणाले.

# १५ व्या वित्त आयोगाच्या निधीवरून आ. राजू खरे आक्रमक अधिकाऱ्यांना दिला इशारा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** १५ व्या वित्त आयोगाचा निधी हा थेट जनतेचा निधी असून त्यावर लोकप्रतिनिधींचा अधिकार आहे, असे प्रतिपादन आमदार राजू खरे यांनी केले आहे. लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या कामांनुसारच त्यांच्या संबंधित भागाला निधी मिळाला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी मोहोळचे आमदार राजू खरे यांनी १५ व्या वित्त आयोगाचा निधी जिल्हा परिषद सदस्यांना वाटपा संदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांची भेट घेतली.या भेटीनंतर ते प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. यावेळी बोलताना आ. खरे यांनी पंढरपूर, मोहोळ आणि उत्तर सोलापूर परिसरातील परिस्थितीवर भाष्य केले. मोहोळमध्ये सत्ताधारी पक्षाचे ७ आणि विरोधी पक्षाचे ५ सदस्य आहेत. मात्र, तिथे ७ कोटी ४० लाखांचा निधी फक्त सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच पराभूत उमेदवारांनी सुचवलेली कामे घेतली जात असल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

यावेळी बोलताना आ.खरे यांनी मोहोळमधील मालकशाही संपवून जनतेने मला विधानसभा निवडणुकीत तब्बल ३१ हजार मताधिक्याने निवडून दिले आहे. त्यामुळे आता ही मनमानी आणि लोकशाहीची गळचेपी अजिबात चालणार नसल्याचे ते पुढे बोलताना म्हणाले. १५ व्या वित्त आयोगाच्या निधीवरून संबंधित गटविकास अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ताकीद दिली आहे. १५ व्या वित्त आयोगाचा चुकीचा आराखंडा मंजूर केला जाऊ नये. अधिकारी जर मनमानी पद्धतीने कारभार करत असतील, तर हा प्रश्न महाराष्ट्राच्या विधानसभेत डोक्यावर घेतल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही आमदार राजूं खरे यांनी दिला आहे.

# श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानचे नारीशक्ती पुरस्कार जाहीर !

## शनिवारी वितरण सोहळा : नऊ महिलांचा होणार गौरव



मिनाक्षी रामपुरे | स्नेहा मकरीये | वंदना गाडे
गौरी जोग | सिमा तापडिया | प्रिती विहिरे
रुमाना शेख | भूमिका क्षिरसागर | रामेश्वरी बेरुनगी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवर नऊ महिलांना "नारीशक्ती" पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. शनिवार दि. १० ऑक्टोंबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजता हा पुरस्कार वितरण सोहळा होणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट यांनी दिली.

रूपाभवानी चौकाजवळील हुतात्मा श्रीकिसन सारडा स्मारक सभागृह येथे हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्रद्धा इन्स्टिट्यूटच्या संस्थापिका स्वाती शहा, एमआयटीच्या प्रा.वंदना कोपकर, सोलापूर जिल्हा बालरंग भूमी परिषदेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार, समर्थ होमिओपॅथिक क्लिनिकच्या डॉ. गौरी बाचल, इनरव्हिल क्लब ऑफ सोलापूर हामोर्नीचे अध्यक्ष नेहा राठी, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे हे सातवे वर्ष आहे. नवरात्रीनिमित्त आदिशक्तीच्या नऊ रूपाप्रमाणेच विविध क्षेत्रातील नऊ महिलांचा नारीशक्ती पुरस्काराने सन्मान होणार असल्याचे महेश कासट यांनी सांगितले. या सोहळ्यास सवार्नी उपस्थित रहावे, असे आवाहन शुभांगी लचके, भारती जवळे, रंजना ढेगले, नर्मदा कनकी, शीला तापडिया, रुपा कुत्ताते, सुजाता सक्करगी, अक्षता कासट, प्रगती तिवारी यानी केले आहे.

### या आहेत नारीशक्ती पुरस्काराच्या मानकरी

मिनाक्षी रामपुरे (कला क्षेत्र), उद्योजिका स्नेहा मकरीये (उद्योग), अमर ज्योती प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्षा वंदना गाडे (सामाजिक), आर्यन्स युनिक प्रीस्कूलच्या चेअरमन गौरी जोग (व्यवस्थापन), डॉ.सिमा तापडिया (वैद्यकीय), एलआयसी ब्रँच मॅनेजर प्रिती विहिरे (विमा क्षेत्र), नर्स रुमाना शेख (आरोग्य), झेडपी शाळा शिक्षिका भुमिका क्षीरसागर (शिक्षण), मनपा बालवाडी शिक्षिका रामेश्वरी बेरुनगी (बाल संस्कार) आदी नऊ मान्यवर महिलांचा या पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत 'क्रांतिवीर भगतसिंग कराटे अकॅडमी'चे घवघवीत यश



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** ओकीनावा मार्शल आर्ट्स अकॅडमीच्या वतीने सातारा येथील स्वराज्य सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत मोहोळ येथील क्रांतिवीर भगतसिंग कराटे अँड स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत तब्बल ११ सुवर्ण, ७ रौप्य आणि ९ कांस्यपदकांची कमाई केली.

४ ऑक्टोबर रोजी झालेल्या या स्पर्धेत कुमिते (फाईट), काता, ग्रुप काता आणि वेपन काता अशा विविध प्रकारांमध्ये राज्यभरातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. मोहोळच्या कराटेपटूंनी विविध वयोगटांत उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत पदकांची लयलूट केली.

कुमिते (फाईट) प्रकारात सुवर्णपदक पटकावणाऱ्या खेळाडूंमध्ये दुर्गेश पाटील, अली शेख, आदर्श सुळे, स्नेहल ठोंबरे, स्वराली सगरे, रूचिरा मंगरुळे, अनन्या देशमुख, प्रतीक्षा सैनी, संस्कृती गायकवाड आणि हर्षदा वाघमोडे यांचा समावेश आहे.

रौप्यपदक समर्थ कोकणे, संस्कार गायकवाड, विराट वाघमोडे, स्नेहल कोकणे आणि मानसी कोकणे यांनी मिळविले. तर कांस्यपदक ऋषिकेश शेडजाळे, शिवराज सुरवसे, आर्या ठोंबरे, स्वामिनी कांबळे, आर्या शिंदे, कृष्णाली नरुटे, सिद्धी पांढरे आणि तनुजा बारसकर यांनी पटकावले.

काता प्रकारात आदर्श सुळे याने सुवर्णपदक मिळविले. संस्कार गायकवाड व विराट वाघमोडे यांनी रौप्यपदक, तर ऋषिकेश शेडजाळे याने कांस्यपदक पटकावले.

या सर्व यशस्वी खेळाडूंना क्रांतिवीर भगतसिंग कराटे अकॅडमीचे संचालक तथा मुख्य कराटे प्रशिक्षक दशरथ काळे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

मोहोळच्या खेळाडूंनी राज्यस्तरीय स्पर्धेत मिळविलेल्या या उल्लेखनीय यशामुळे मोहोळ तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल सर्व विजेत्या खेळाडूंचे तसेच प्रशिक्षक दशरथ काळे यांचे क्रीडा क्षेत्रातून कौतुक होत असून, त्यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सलगर वस्तीतील नागरिकांच्या समस्यांवर उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर 'ऑन द स्पॉट' जनतेच्या दारी



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक २३ मधील सलगर वस्ती परिसरातील नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी महेश देवकर यांनी संबंधित विविध विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष परिसराची पाहणी केली. यावेळी नागरिकांनी मांडलेल्या समस्या जागेवरच जाणून घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले.

सलगर वस्ती परिसरात रस्त्यांची दुरवस्था, पिण्याच्या पाण्याची समस्या, अस्वच्छता तसेच पथदिव्यांच्या अभावामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी उपमहापौरांकडे केल्या होत्या. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत उपमहापौर देवकर यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावून प्रत्यक्ष पाहणी केली.

पाहणीदरम्यान परिसरातील अस्वच्छ ठिकाणांची तातडीने स्वच्छता करण्याचे निर्देश आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले. तसेच खराब रस्ते, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि पथदिव्यांच्या समस्यांची पाहणी करून संबंधित विभागांनी आवश्यक ती कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी महेश देवकर यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचना देताना सांगितले की, 'नागरिकांनी वारंवार तक्रारी करण्याची वेळ येता कामा नये. नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांकडे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. नागरिकांच्या समस्या वेळेत सोडविल्या गेल्या पाहिजेत. संबंधित कामांमध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा अथवा दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही.'

त्यानंतर पाटील नगर, अनुपम पार्क, स्वामी विवेकानंद भाग-२, माशाळ वस्ती, राणा प्रताप नगर तसेच सूरज प्राईड अपार्टमेंट परिसराचीही प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या ठिकाणी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी विधी व न्याय समितीचे सभापती सत्यजित वाघमोडे, उद्यान व मंडई विभागाचे सभापती राजशेखर पाटील, भारतीय जनता पार्टी दक्षिण-पश्चिम मंडळ अध्यक्ष महेश देवकर, अक्षय वाकसे, नियंत्रण अधिकारी साय उपयुक्त सोनाली यादव मॅडम विभागीय कार्यालय क्रमांक ६ चे अधिकारी पानगल, लाईट विभागाचे अधिकारी परदेशी, उद्यान विभागाचे अधिकारी स्वप्निल सोलनकर, दिलीप भामरे, कनिष्ठ अभियंता दीपाली चव्हाण, कनिष्ठ अभियंता देवकर, कनिष्ठ अभियंता शिंदे, आरोग्य निरीक्षक मस्के, दुड्डे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमहापौर देवकर यांनी यावेळी सांगितले, 'प्रभागातील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. नागरिकांनी समस्या घेऊन वारंवार महानगरपालिकेच्या कार्यालयात येण्याची वेळ येऊ नये, यासाठी संबंधित विभागांनी प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन समस्या समजून घेऊन त्यावर तातडीने कार्यवाही करावी. नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण करून त्यांना दिलासा देणे हीच आपली प्राथमिकता आहे.'

# अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त ग्रंथपूजनाने सप्ताहाचा शुभारंभ



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय येथे अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथ पूजनाने करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते ग्रंथ पूजन करण्यात आले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी महसूल अंजली मरोड, उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख, तहसीलदार पूनम दंडेले, तहसीलदार सरस्वती पाटील, नायब तहसीलदार बालाजी बनसोडे, तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव प्राध्यापक शिवाजी शिंदे, जिल्हा मराठी भाषा समिती सदस्य पद्माकर कुलकर्णी आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त उपस्थित सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. मराठी भाषा ही शिकण्यासाठी अतिशय सोपी व प्रेमळ भाषा असून संत व साहित्यिकांनी मराठी भाषा समृद्ध केली आहे, असे त्यांनी सांगितले.

प्राध्यापक शिवाजी शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मराठी भाषा ही समृद्ध भाषा असून, शासनाने 2024 मध्ये मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देऊन तिची उंची वाढवली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज तसेच संतांनी मराठी भाषेतला गोडवा जगासमोर आणला, तर छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषेचा धारदार बाणा जगाला दाखवला. विभागानुसार भाषेची बोली बदलते, प्रत्येक भागात भाषेची लय वेगळी जाणवते. मराठी भाषा ही शब्दांनी समृद्ध अशी भाषा आहे. शासनाच्या धोरणानुसार जिल्हा मराठी भाषा समितीने अतिशय जुन्या ग्रंथांचे डिजिटायझेशन करून ग्रंथ जतन केले आहेत.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी भाषा समिती सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी केले.

# मार्डीत शहीद भगतसिंग यांची जयंती उत्साहात साजरी



**उत्तर सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मार्डी येथे निर्मल हृदय दादा युवा प्रतिष्ठान आणि संत वीरशैव कक्कय्या समाज प्रबोधन मंच यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद भगतसिंग यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. माजी सैनिक मेजर मारुती जाधव आणि मेजर लक्ष्मण राठोड यांच्या हस्ते भगतसिंग यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते बाळासाहेब देशमुख होते.

यावेळी मेजर मारुती जाधव म्हणाले, पंजाबमध्ये आजही भगतसिंग यांच्याबद्दल सामान्य नागरिकांच्या मनात मोठी श्रद्धा आहे. त्यांच्या स्मृती आणि देशसेवेच्या कार्यातून प्रेरणा घेऊन अनेक युवक सैन्यात दाखल होत आहेत. शहीद स्वातंत्र्यसैनिकांबद्दल प्रत्येकाच्या मनात आदराची भावना असणे गरजेचे आहे. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय खरटमल यांनी माजी सैनिक मेजर मारुती जाधव आणि मेजर लक्ष्मण राठोड यांचा सत्कार केला.

कार्यक्रमास शिवाजीराव सोनार, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री विष्णू जगताप, प्रशांत काशिद, पोपट साठे, आबा काटे, भीमाशंकर नारायणकर, अशोक नारायणकर, चंद्रकांत नारायणकर, योगेश नारायणकर, मोतीराम नारायणकर आदी उपस्थित होते.

# दक्षिण सोलापूर तालुक्यात चौथी व सातवी शिष्यवृत्ती कार्यशाळेला उत्स्फूर्त सुरुवात



**दक्षिण सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंचायत समिती दक्षिण सोलापूरच्या शिक्षण विभागाच्या वतीने इयत्ता चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२७ च्या तयारीसाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेला तालुक्यातील शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी सक्षमपणे तयार करण्याच्या दृष्टीने विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येत आहे.

इयत्ता चौथीच्या शिक्षकांसाठी लोकसेवा हायस्कूल, मंद्रूप येथे, तर इयत्ता सातवीच्या शिक्षकांसाठी मार्कंडेय हायस्कूल, कुंभारी येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. मंद्रूप पगार बीट अंतर्गत सहा केंद्रांतील इयत्ता चौथीचे शिक्षक या कार्यशाळेस उपस्थित होते.

या कार्यशाळेस गटविकास अधिकारी मा. श्री. मनोज राऊत साहेब यांनी भेट देऊन शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी स्पर्धा परीक्षांचे महत्त्व, विद्यार्थ्यांची योग्य तयारी, नियमित सराव, प्रश्नपत्रिका सोडविण्याची पद्धत तसेच विद्यार्थ्यांमध्ये परीक्षेविषयी आत्मविश्वास निर्माण करण्याबाबत मार्गदर्शन केले.

शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी पात्र व्हावेत, तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांची प्रभावी तयारी करता यावी, हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश आहे. त्यासाठी विषयतज्ज्ञ व मार्गदर्शक शिक्षकांच्या माध्यमातून मराठी, गणित, इंग्रजी, बुद्धिमत्ता व शंका समाधान या घटकांवर सखोल मार्गदर्शन करण्यात येत आहे.

या उपक्रमामुळे शिक्षकांना अध्यापनाच्या प्रभावी पद्धती, प्रश्नांचा सराव आणि विद्यार्थ्यांची परीक्षाभिमुख तयारी याबाबत दिशा मिळत असून, दक्षिण सोलापूर तालुक्याचा शिष्यवृत्ती परीक्षेतील निकाल उंचावण्यासाठी हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.

# महर्षि शंकरराव मोहिते प्रशालेच्या खेळाडूंचे घवघवीत यश




**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला, यशवंतनगरच्या खेळाडूंनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये आपल्या गुणवत्तेची दमदार छाप उमटवत प्रशालेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली आहे. वेटलिफ्टिंग, कुस्ती, ज्युदो व बुद्धिबळ या क्रीडा प्रकारांमध्ये प्रशालेच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत सात खेळाडूंनी विभागीय स्पर्धेची पात्रता मिळवली आहे. जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत सार्थक संग्राम राऊत याने १४ वर्षे वयोगटात जिल्हास्तरीय कामगिरी करत विभागीय स्पर्धेसाठी निवड मिळवली, तर वैभव देशमुख याने १७ वर्षे वयोगटात उल्लेखनीय कामगिरी केली.

जिल्हास्तरीय ज्युदो स्पर्धेत प्रशालेच्या मयुरी काळे हिने ४४ किलो वजनगटात १४ वर्षे वयोगटातून जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत विभागीय स्पर्धेसाठी निवड मिळवली. शुभम जाधव याने ७३ किलो वजनगटात १९ वर्षे वयोगटातून जिल्ह्यात तृतीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली.

कुस्तीच्या मैदानातही प्रशालेच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी केली. मयुरी काळे, ओंकार नवसुपे, शुभम जाधव, अभिजीत करे, शंभुराजे कामकरे आणि सोहम शेंडे यांनी विविध वजनगटांत उत्कृष्ट कामगिरी करत प्रशालेचे नाव उज्ज्वल केले.

तसेच वेटलिफ्टिंग स्पर्धेत मयुरी काळे, ओंकार नवसुपे, शुभम जाधव, शंभूराजे कारमकर, सोहम शेंडे, वैष्णवी शिंदे, विजय कांबळेयांनी जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदवत आपल्या कौशल्याची चमक दाखवली.

खेळाडूंच्या या यशामागे त्यांचा सातत्यपूर्ण सराव, जिद्द, मेहनत आणि क्रीडा शिक्षक प्रदीप पांढरे यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. मैदानावरील जिद्द आणि बुद्धिबळाच्या पटावरील एकाग्रता यांचा सुंदर संगम साधत प्रशालेच्या खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात यशाचा नवा अध्याय लिहिला आहे.

या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील, मुख्याध्यापक संजय गळीतकर, शिक्षकवृंद व पालकांनी सर्व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून आगामी विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# मोडनिंब येथे शिक्षकाच्या घराचे कुलूप तोडून २ लाख ४३ हजारांचा ऐवज लंपास

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** मोडनिंब (ता. माढा) येथे अज्ञात चोरट्याने शिक्षकाच्या घराच्या पाठीमागील दरवाजाची कडी, कोयंडा व दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. कपाटातील चांदीचे दागिने, महागडे हातातील घड्याळ आणि तब्बल २ लाख रुपये रोख, असा एकूण २ लाख ४३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना ४ ऑक्टोबर रोजी दुपारी घडली. याप्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेली सविस्तर माहिती अशी की, मोडनिंब येथील शिक्षक अन्वरहुसेन बापूसाहेब मुलाणी (वय ५१) हे ४ ऑक्टोबर रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान घराबाहेर होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या पाठीमागील दरवाजाची कडी, कोयंडा व दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर रूममधील कपाटातून दोन जोड चांदीचे पैंजण, चांदीची गळ्यातील चैन, चांदीचे कडे, चांदीची अंगठी, टायटन कंपनीचे हातातील घड्याळ तसेच २ लाख रुपये रोख रक्कम, असा एकूण २ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

या घटनेबाबत शिक्षक अन्वरहुसेन मुलाणी यांनी ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.५० वाजता टेंभुर्णी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा रजिस्टर क्रमांक ७५२/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०५, ३३१(३) अन्वये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील पोलीस निरीक्षक राजकुमार भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सपोनि रोहित पवार करीत आहेत.